

मुलाखत






वंदना भागवत

ख्यातनाम स्त्रीवादी साहित्यिक-समीक्षक, तसेच इंग्रजी साहित्याच्या अध्यापक

onlyvandan@gmail.com

। देवकुमार अहिरे

इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक, तसेच सामाजिक चळवळींचे अभ्यासक

devkumarahire@gmail.com


# “स्त्रीवादी चळवळीला अंतर्गत समीक्षेची गरज आहे”

## मनीषा गुप्ते




**स्त्रीचळवळ आणि स्त्रीअभ्यास ह्यांच्यासमोर आज अनेक प्रश्न उभे आहेत. अस्मिता व स्वायत्ततेचं राजकारण, वर्ग, जात, धर्मभेद ह्यात विभागलेलं समाजवास्तव, सामंतशाहीचं जोखड, नवभांडवलशाहीमुळे लोकांच्या आयुष्यात निर्माण झालेले नवे प्रश्न इ. ह्या प्रश्नांना भिडून त्याविषयीचे नवे चिंतन मांडणाऱ्या, आणि त्यासोबतच आपल्या जडणघडणीचे पापुद्रे अलवारपणे सोलणाऱ्या स्त्रीकार्यकर्ता-विचारकाच्या मुलाखतीचा पूर्वार्ध**

**सर्वंकष:** *नमस्कार. महाराष्ट्रातील बौद्धिक वातावरण निर्भय आणि निर्वैर व्हावे ह्यासाठी ‘सर्वंकष’ करीत असलेलं कार्य तुमच्या परिचयाचं आहे. विविध क्षेत्रांतील महत्त्वाच्या व्यक्तींच्या विचारोत्तेजक व निर्भीड दीर्घ मुलाखती हे आमच्या अंकाचे एक ठळक वैशिष्ट्य आहे. आमचा पुढील अंक हा ‘स्त्री चळवळीची पन्नास वर्षे’ विशेषांक असणार आहे. त्यानिमित्ताने तिच्या आजवरच्या वाटचालीची सखोल समीक्षा व्हावी व त्यातून तिच्यापुढील महत्त्वाची आव्हानं व भावी दिशा स्पष्ट व्हावी हा त्यामागील उद्देश आहे. भारतातील एक महत्त्वाची स्त्रीवादी विचारक, संशोधक व वास्तवाशी जैव संबंध असणारी कार्यकर्ती म्हणून तुमच्याशी ह्या संदर्भातील सर्व मुद्द्यांची चर्चा करण्याचा आमचा मानस आहे.*

*आजच्या काळात जगभरात स्त्रीवादाविषयी अनेक गैरसमज पसरले आहेत. ‘आम्ही स्त्रीवादी नाही’ असे म्हणण्याची पद्धत रूढ झालेली आहे. खरं तर स्त्रीवाद हा कोणत्याही सामाजिक किंवा राजकीय चळवळीचा पाया आहे. कारण स्त्री आणि पुरुष या दोघांचं नातं अधिक निर्मळ व समताधारित कसं होईल, ज्यामुळे जगासमोरील वेगवेगळ्या प्रश्नांकडे आपण स्वातंत्र्य, समता बंधुता ह्या मूल्यांच्या पातळीवरून बघू शकू ह्याबाबत स्त्रीवाद आपल्याला महत्त्वाची अंतर्दृष्टी देतो. पाश्चात्य आणि भारतीय स्त्रीवाद आजच्या टप्प्यात अनेक अंगांनी बहरलेला आहे आणि मानवी भवितव्याचा विचार करताना तो पायाभूत विचार आहे असं आमचं म्हणणं आहे. आजही ‘जे वैयक्तिक ते राजकीय’ या इतकी भेदक घोषणा दुसरी कुठली नाही. आज भारतात, तसेच जगभरात स्त्रीवाद संपवण्याचे कसून प्रयत्न होत आहेत. भारतातील स्त्रियांची चळवळ आणि स्त्रीवाद ह्यांच्यासमोर अनेक महत्त्वाची आव्हाने उभी आहेत, उदा.; पुरुषांचा चळवळीतील सहभाग, जात, वर्ग, आणि क्विअर समूहाच्या प्रश्नांना सोबत घेऊन स्त्रीवादाची नव्याने मांडणी करणे, पर्यावरणसंहार आणि धर्मांधता ह्यांचा*



*मुकाबला, राजकारणात हस्तक्षेपाबद्दल आपली भूमिका. ह्या सर्व प्रश्नांची चर्चा आपण करणार आहोत. संवादाची सुरुवात व्यक्तिगत प्रश्नापासून करू या. तुम्ही एक स्त्रीवादी अभ्यासक, कार्यकर्त्या आणि संशोधक म्हणून प्रसिद्ध आहात. ही ओळख घडण्यामध्ये तुमचं कुटुंब आणि सामाजिक पार्श्वभूमी ह्यांची काय भूमिका होती?*

**मनीषा:** माझ्या कुटुंबियांनाच बहुतांश श्रेय जाते ; त्या मानाने माझं योगदान काहीच नाही. माझे आजोबा पनवेलमध्ये वकील होते. स्वातंत्र्यचळवळीमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांनी वकिलीचं काम कमी केलं. तिकडे पनवेल नगरपरिषदेची स्थापना झाल्यावर काँग्रेसच्या वतीने ते तीन वेळेस बिनविरोध अध्यक्ष बनले. तिथे राष्ट्र सेवा दलाच्या शाखा माझ्या आत्याने सुरू केल्या. माझे काका स्वातंत्र्यचळवळीत होते आणि त्यासाठी त्यांनी कारावासही भोगला होता. माझे वडील (वसंत गुप्ते) लहानपणापासून प्रभातफेरीत जायचे. तिकडे जाताना ते घरातील इतरांप्रमाणे खादी घालायचे. तेथे 'लेंगे लेंगे-लड कर स्वराज्य लेंगे' हे गीत गायलं जायचं. त्यांना हिंदी समजत नव्हतं. त्या लहान वयात त्यांना वाटायचं की लेंगे-लेंगे म्हणजे खादीचा लेंगा घालून स्वराज्य मिळवायचं आहे. म्हणजे त्यांच्या त्या कोवळ्या वयापासून घरात प्रगतीशील वातावरण होतं. माझ्या वडिलांनी वकील व्हावं असं माझ्या आजोबांना वाटलं. माझ्या वडिलांना मात्र इंजीनियर व्हायचं होतं. पुण्याच्या आय एल एस लॉ कॉलेजमधून त्यांनी १९४८-५० मध्ये वकिलीचं शिक्षण पूर्ण केलं आणि माझ्या आजोबांना सांगितलं की "मी तुमचं ऐकून वकील झालो. आता तुम्ही माझं ऐका, मी आयुष्यभर वकिली करणार नाही." यादरम्यान त्यांची भेट आचार्य अत्रेंसोबत झाली. अत्रेंनी त्यांना सांगितलं की 'छोट्या तलावातला मोठा मासा व्हायचा नाही, मोठ्या तलावातला छोटा मासा व्हायचं. तू पनवेलमध्ये राहू नकोस. मुंबईला जा!' तेव्हा वडील मुंबईला आले. हिंद मजदूर सभा या कामगार चळवळीत आयुष्य घालविले आणि थेट सुप्रीम कोर्टापर्यंत त्यांच्या युनियनसाठी वकिली केली पण त्यातून एक पैसाही कमवला नाही, . माझी आई (शालिनी – आधीची पाध्ये-पाटील, नंतर गुप्ते) वसई-विरारच्या परिसरातील पारंपरिक कुटुंबातून आली होती. वसईच्या वर्टी मास्तर इत्यादींच्या संपर्कात आल्यामुळे तिच्या पूर्ण कुटुंबात ती एकटीच समाजवादी झाली आणि तेही किशोर अवस्थेत असतांना. माझ्या आईचे आई-वडील ती सहा-सात वर्षांची असतानाच वारले. त्यानंतर ती सहा मोठे भाऊ आणि वहिनी यांच्यासमवेत लहानाची मोठी झाली. या बंडखोर मुलीला कसं वाढवावं हे माझ्या बिचाऱ्या मामा-मामींना कळतच नव्हतं. आईच्या घराजवळ येशूचा क्रॉस होता, त्या ठिकाणी ख्रिस्ती समूहाचा 'मास' भरायचा. मास संपला की आई तिथे जाऊन प्रसादाचे चणे खाऊन यायची. किरीस्तावाकडचे चणे खाल्लेत म्हणून ओसरीवरच तिच्या डोक्यावर घागरभर पाणी ओतलं जायचं. ते घातल्यावर ती ओल्या अवस्थेत परत जाऊन चणे खायची. कोपऱ्यावरचा मास झाला की आळीतल्या लोकांसाठी पुढचा तमाशा मामांच्या घरासमोर असायचा. तिकडे सगळे लोक करमणुकीसाठी गोळा व्हायचे. कुटुंबीयांनी पुढे आईला पुण्यातील हिंगणे इथे पाठवलं, तिथे ती कर्वे कुटुंबाचा भाग झाली. अण्णासाहेब, म्हणजेच महर्षि कर्वे आणि आनंदीबाई (बाया) कर्वे तिथेच असायचे. थोडी मोठी झाल्यावर ती साने गुरुजींच्या सान्निध्यात आली. गुरुजी तिला मुंबईत घेऊन गेले. तेथे त्यांनी नुकतीच गिरणी कामगारांच्या हक्कांसाठी मिल मजदूर सभा सुरू केली होती. तिकडे काही महिन्यानंतर माझे वडीलसुद्धा वकील होऊन १९५० मध्ये रुजू झाले. **आई १९ वर्षांची आणि वडील २३ वर्षांचे असताना त्यांनी आंतरजातीय लग्न केलं. त्या काळात हे लग्न सफेद खादीमध्ये आणि रजिस्टर पद्धतीने करण्यात आलं. माझ्या आजोबांसोबत पीटर अल्वारिस आणि राजा कुलकर्णी हे कामगार चळवळीत असलेले ज्येष्ठ सहकारी लग्नाचे साक्षीदार होते. आईला स्वयंपाक येत नव्हता, तो वडिलांनी तिला शिकवला. आई सुरुवातीस मांसाहार करत नसे म्हणून वडिलांनीही अनेक वर्ष मासे-मटण खाल्ले नाही.** लग्नानंतर कवडीचे उत्पन्न नसल्याकारणाने बाळ सांभाळण्याची आर्थिक परिस्थिती नव्हती. म्हणून माझा जन्म त्यांच्या लग्नानंतर चार-साडेचार वर्षांनी झाला. माझे वडील हिंद मजदूर सभेचे राष्ट्रीय सचिव होते. अतिशय बुद्धिमान, स्पष्टवक्ते आणि दयाळू असा त्यांचा स्वभाव होता. मी सध्या ६८ वर्षांची आहे, मी जन्मल्यानंतर 'मुलगी झाली' म्हणून माझं नाव 'मनाची इच्छा' पूर्ण झाली या अर्थाने मनीषा ठेवलं. घरातील बाथरूम साफ करणं, स्वयंपाक करणं - म्हणजे फक्त एखादा गोड पदार्थ नव्हे तर कोशिंबीरीपासून बिर्याणीपर्यंत आणि घरी दही लावून श्रीखंडापासून वरण-भातापर्यंत सगळं, तसेच मासे वगैरे संपूर्ण

स्वयंपाक ते करायचे. आम्हा दोघी बहिणींना 'चंपी तेल मालिश' सारखी गाणी गात, अंघोळ घालणं, रात्री अंगाई म्हणून झोपवणं, हे सगळं ते करत. **माझी जुनी आणि जवळची स्त्रीवादी मैत्रीण आभा भय्या म्हणते की 'रमेश (माझा नवरा) इज लाईक ए वुमन अँड नाना (वडील) इज ए वुमन'**. खरोखर या बोलण्यामागे खूप मोठा अर्थ दडलेला आहे.

आता आमच्या घरच्या वातावरणाकडे येते. आम्ही घरात कोणत्याही गोष्टीवर वाद घालू शकायचो. मी तर माझ्या नावावरूनही वाद घातले आहेत. मी वडिलांना म्हणायचे, 'नाना, मुलगीच पाहिजे असं म्हणून तुम्ही भेदभाव नाही का केला? मुलगा झाला असता तर काय केलं असतं?' ते म्हणायचे, 'मी तेवढंच प्रेम त्याच्यावरही केलं असतं. जाऊ दे ना, तू झालीस, मला खूप आनंद झाला'. आम्ही दोघी बहिणी अशा भेदभावविरहित वातावरणात वाढलो. गंमतीत म्हणायचे झाले तर नानांची लोकशाही आणि आईची ठोकशाही असे आमचे बालपण होते.

आमचं छोटसं घर आईच्या नावावर होतं. आपण ज्याला पितृसत्तेचे निकष म्हणतो - बाईने न कमावणं, पुरुषाने कमावणं, संपत्ती पुरुषाच्या नावावर असणे - ते कोणतेच आमच्या घरात नव्हते. अर्थात, आमच्या नावात आम्ही वडिलांचं आडनाव नाव लावतो, त्या अर्थी मात्र पितृसत्ता आहे. घरात कधीच पैसे नसायचे. कारण युनियन पैसे देणार कुठून? त्यामुळे कालांतराने आईने युनियन सोडून नोकरी धरली आणि घर चालवलं कधी कधी आपल्याला जे सर्वात जास्त आवडतं, ते सोडावं लागतं, तर ते आईने केलं. नानांना वर्षातून दोन-तीन वेळा अटक व्हायची. २६ जानेवारी, १५ ऑगस्ट तर ठरलेलंच असायचं. कारण या दिवशी विविध सत्याग्रह वगैरे असायचे. आईच्या नोकरीच्या ठिकाणी फोन जायचा आणि मग १०-१५ दिवसानंतर तिची नोकरी जायची. असं करत-करत ती शिक्षिका झाली. तिच्या जिभेवर अक्षरशः सरस्वती असायची. तिचं लिखाण, वाचन, बोलणं वगैरे जबरदस्त असायचं. तिने राष्ट्रभाषा पंडित केलं, साहित्य विशारद केलं, रत्न केलं आणि हे सर्व तिने दीड-दीड नोकरी करून केलं. एका पगारावर घर चालत नव्हतं, त्यामुळे ती त्याशिवाय कुठेतरी अर्धा दिवस नोकरी करायची. साने गुरुजी तिला खूप आधी आचार्य अत्रेंकडे घेऊन गेले होते आणि म्हणाले होते की, "बाबुराव, हिला नोकरीला लावा, ही माझी लेक आहे, मी हिची आई". गुरुजी स्वतःला आई म्हणायचे. तेव्हा अत्रे म्हणाले होते, "पोरी, गुरुजी तुझी आई आणि मी तुझा बाप, मला आजपासून पप्पा म्हणायचं." सारख्या नोकऱ्या जातात म्हणून शेवटी कंटाळून आई अत्रेंकडे गेली आणि त्यांनी तिला लागलीच 'मराठा' मध्ये घेतलं. तिकडे आईचे सख्खे मित्र होते, ते म्हणजे विजय तेंडुलकर आणि हमीद दलवाई. यांचं त्रिकूट होतं आणि या सर्वांच्या प्रेमळ सावलीत मी वाढले. आई अवघ्या ४५ वर्षांची असताना गेली. आयुष्यभर केलेली वणवण, १९७७ सालच्या आणीबाणी विरोधातील निवडणुकीत केलेली जीवघेणी धावपळ, उच्च रक्तदाब आणि मधुमेहाकडे केलेले दुर्लक्ष्य ही कारणे असणार, दुसरे काय? त्यावेळी मी २१ वर्षांची आणि धाकटी बहीण गिरीजा १४ वर्षांची. आई गेल्यानंतर नाना पूर्णतः आमचे आई-वडील झाले. सर्व आत्या, काका-काक्या यांनी सुद्धा खूप प्रेम दिले.

घरात पैसे नसायचे याची कधीच खंत वाटली नाही; किंबहुना आपले वडील प्रामाणिक असल्याची ती पावती समजायचो. नाहीतरी त्या काळात शेजारपाजारच्या सर्वच मुली दिवसभर पेटीकोटवर खेळायच्या. आमचे दोन साधे सुती फ्रॉक आणि एखादाच नायलॉनचा असायचा, मोठया चुलत आते-बहिणीकडून आलेला एखादा ड्रेस असायचा (आमच्याकडून तो पुढे इतर लहान भावंडांना जायचा!), जो सर्व सोहळ्यांना घातला जात असे. पुस्तकं मात्र कायम असायची घरामध्ये. त्यासाठी आई-वडील पैसे कसे बाजूला टाकायचे हे मला माहित नाही. काय वाचायचं यावर कसलाही निर्बंध नव्हता, मात्र इंग्रजी क्लासिक्सपासून कवितासंग्रह घरी असायचे. आई तेव्हापर्यंत मराठी-हिंदीची शिक्षिका झाली होती. आम्ही इंग्रजी माध्यमात शिकत होतो; मात्र हिंदी-मराठी सुद्धा वाचलं पाहिजे असा आग्रह असल्यामुळे शिवचरित्राचे खंड मी नववीत असतानाच वाचले. त्याकाळात 'ययाती' आणि 'कौन्तेय' पासून ते ललित साहित्य, साने गुरुजींचं लिखाण, मराठीतील नाटके, टागोर, शरदचंद्र आणि इतर लेखकांच्या साहित्याची मराठीत झालेली भाषांतरं वाचलीत. दुसरं म्हणजे गाणी ऐकायला पैसे लागत नसत. त्यामुळे कायम गाणी चालू असायची. सेहगल, पंकज मलिक, तलत मेहमूद, नाट्यसंगीत इत्यादींचा मनावर फार मोठा प्रभाव झाला.

आमच्या बालपणाचे टप्पे हिंद मजदूर सभेची किंवा प्रजा समाजवादी पक्षाची कॉन्फरन्स ह्यांच्या निमित्ताने पार पडले. या निमित्ताने वेगवेगळी शहरं पाहता आली. देशाच्या पातळीवर मोठे नेते खूप जवळून पाहिले. त्यांच्याशी केवळ वैचारिक नव्हे तर भावनिक जवळीक होती, वरील सर्व दिग्गजांच्या प्रभावाखाली मी मोठी झाले. आधी म्हटल्याप्रमाणे या सर्वांच्या मानाने माझं स्वतःचं म्हणून असलेलं योगदान खूपच कमी.

माझं लहानपण साने गुरुजी कथामाला आणि राष्ट्र सेवादलामध्ये गेलं. सेवादलाची आणि संघाची शाखा जवळजवळ भरायची. दोन्ही शाखांचे संस्कार पूर्णपणे वेगळे होते. तेव्हा पार्ल्यातल्या गुजरात सोसायटीमध्ये काँग्रेस होती, शिवानंद सोसायटीमध्ये ४-५ समाजवादी आणि १-२ डाव्या विचारसरणीची

घरं सोडली तर जनसंघाकडे कल होता. आमची 'नवसमाज' (माझ्या वडिलांसारख्या समाजवाद्यांनी बांधलेली) सोसायटी समाजवादी विचारांची होती. खोल वैचारिक मतभेद असले तरीही लोकांचे व्यक्तिगत संबंध निरामय होते. नंतर तरुणपणामध्ये जेपींनी स्थापन केलेल्या छात्र युवा संघर्ष वाहिनीशी मी जोडले गेले.

वडील कामगार चळवळीत असल्याने गिरणीमालकांशी आमचा जास्त संबंध येत नसे, क्वचित कोणी घरी भेटायला आलं तर पाच मिनिटं बोलायचे आणि चालले जायचे, परंतु फार संबंध किंवा घरोबा ठेवला गेला नाही. सलोखा वाढला तर त्यांच्या विरोधात भूमिका घेणे कठीण होऊ शकते हे त्यामागचे कारण असावे. मात्र कोणी कामगार आला, तर तो जेवल्याशिवाय किंवा एखादी रात्र राहिल्याशिवाय कधीच आमच्या घरातून गेला नाही. माझ्या आजोबांच्या घरामध्ये सुद्धा पूर्वीपासून सर्व जातीधर्माचे लोक यायचे. त्यावरून एकदा आजी म्हणाली की 'लोक असं-असं बोलतात आपल्याबद्दल.' त्यावर आजोबा म्हणाले 'मग तसं बोलणाऱ्यांनी येऊ नये आपल्या घरी. येथे कोण येणार हे आपण ठरवणार ना? तुला त्रास होतोय का?' आजी म्हणाली, 'मला बिलकुल त्रास होत नाही.' 'मग झालं तर..', आजोबा आपल्या शांत स्वभावाला अनुसरून म्हणाले.

**सर्वंकष:** *आम्ही ऐकलंय की तुम्ही खूप वेगळ्या प्रकारचं सहजीवन जगलात, तर त्याबद्दल सांगा. तुमच्या सासरची कौटुंबिक पार्श्वभूमी कशी होती आणि त्यात तुम्ही कशाप्रकारे जगण्याचा निर्णय घेतला? त्या सगळ्याचा तुमच्या पालकत्वावर काही परिणाम झाला का?*

**मनीषा:** नक्कीच झाला. आमच्या आधीच्या पिढीतले आई-नाना १९५० साली समाजवादी कामगार चळवळीत भेटले. आमच्या पिढीत १९७७ मध्ये रमेश (अवस्थी) आणि मी आणीबाणी आणि छात्र युवा संघर्ष वाहिनीमध्ये भेटलो, आणि चार-पाच वर्षांनी आम्ही लग्न केलं. आज मला असं वाटतं की **आजच्या काळात भेटलो असतो तर लग्न केलं असतं की नाही कोण जाणे! पितृसत्तेचा पाया असलेल्या विवाह व्यवस्थेत का पडावे या आशयाने हा विचार मनात येतो. अर्थात, जोडीदार म्हणून मला आजही रमेशच आवडला असता यात शंका नाही. वरकरणी आमचे स्वभाव वेगळे असले तरीही त्याच्या-माझ्यामध्ये वैचारिक समज खूप एकसारखी होती आणि आहे.**

रमेशचं पंजाबी कुटुंब फाळणीच्या आठ दिवस आधी लाहोर जवळील शेकुपुरामधून भारतामध्ये आलं होतं. रमेश स्वतंत्र भारतात झांशी जिल्ह्यात जन्माला आला पण 'तमस' सीरिअल मध्ये आपण पाहिलं ना, तसा माझ्या सासऱ्यांच्या (डॉ वेदप्रकाश शर्मा) सोबत सासूबाईंनी (सियालकोट भागात जन्मलेल्या सोमवती/पद्मावती देवी) दोन छोटी मुलं जवळ, एक मूल पोटात आणि लहान नणंदांना घेऊन केलेला तो अतिभयंकर प्रवास. त्यांचे आईवडील मात्र त्यांच्यासोबत आले नाहीत. म्हणाले की, 'सरकार बदलले म्हणजे काय देश बदलला का? देश तर आपलाच आहे ना!' सासरे म्हणाले – 'कमीत कमी बहिणींना तरी माझ्यासोबत नेऊ द्या.' मग बहिणींना पाठवलं. तीन महिन्यानंतर निर्वासित म्हणून आलेले आईवडील भारतातील मिलिटरी कॅम्पमध्ये सापडले.

सासऱ्यांच्या आईच्या माहेरचे संपूर्ण कुटुंब (एकूण आठ लोक) अर्ध्या तासात मारले गेले. माझ्या सासुबाईंचे वडील (जे लाहोर स्टेशनवर डेप्युटी चीफ कंट्रोलर होते) प्रेतांनी भरलेल्या लाहोरच्या प्लॅटफॉर्मवरून चालत जाऊन दिल्लीला जाणाऱ्या शेवटच्या गाडीत कसेबसे चढले. इतकी भयानक आणि जीवघेणी परिस्थिती कुणावरही येऊ नये.

माझ्या सासऱ्यांनी त्याकाळी जे पाहिलं ते खूप विदारक होतं. हिंदू, शिख आणि मुसलमान या सगळ्यांनी एकमेकांच्या कत्तली केल्या. सर्वांनी स्वधर्मीय लोकांनासुद्धा लुटलं आणि इतरांच्याच काय, पण स्वधर्मीय महिलांवरही बलात्कार केले. मग कोणी कोणाला दोष द्यायचा? त्यांनी अशी परिस्थिती अनुभवली होती की जी ऐकूनसुद्धा आपल्या अंगावर काटा येतो. तरीसुद्धा त्यांनी आपली माणुसकी सोडली नाही. असं हे रमेशचं साधंसुधं, शिक्षित, पारंपरिक कुटुंब होतं. सासऱ्यांचे आणि सासूबाईंचे कुटुंबीय आर्यसमाजी विचारांचे होते. घरामध्ये मूर्तीपूजन होत नसे. सासरे मोठया मनाचे, शिस्तबद्ध, लोकांना खूप आवडणारे डॉक्टर आणि अतिशय प्रेमळ होते, भेटले की घट्ट मिठी मारायचे (सासूबाई तर कपाळाचे चुंबनही घ्यायच्या). फाळणीची झळ अनुभवली असून सद्धा आपल्या मुलांच्या मनात धार्मिक भेदाचं विष नाही पेरायचं असं सासरे आपल्या (संपूर्ण माहेर गमावल्यामुळे) उद्विग्न झालेल्या आईला बोलून दाखवायचे. . ते डॉक्टर होते परंतु त्यांचं डॉक्टरकीचं सर्टिफिकेटदेखील स्थलांतरात हरवलं होतं. घरातल्या सगळ्या लोकांना, मुलाबाळांना सुरक्षितपणे इथपर्यंत घेऊन आले, नेसत्या वस्त्रानिशी येऊन सुद्धा समथरमध्ये आणि त्यानंतर उत्तर प्रदेशात सरकारी डॉक्टर म्हणून रुजू होता आलं, नव्याने आयुष्य उभारू शकले हीच त्यांच्यासाठी खूप समाधानाची बाब होती.

आपल्या मुलांना शिक्षण देताना देखील सासऱ्यांनी त्यांच्या मनात माणुसकीचं मूल्य रुजवलं. मुलांच्या आयुष्य जगण्याच्या निर्णयाच्या आड ते आले नाहीत. रमेश दिल्ली आयआयटीत केमिकल इंजिनियरिंग मध्ये एम. टेक. करत असताना, अगदी

बीटेक पासूनच कॅम्पसमध्ये समाजवादी विद्यार्थी चळवळीत सक्रीय होता.. १९७२ मध्ये तो एम एन रॉय यांच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेने प्रेरित झाला, आणि त्यानंतर जयप्रकाश नारायण यांच्या महागाई आणि भ्रष्टाचार विरोधी चळवळीत आला. सासऱ्यांनी त्याला म्हटलं, "तू जे हे करतोयस, ह्याचा त्रास मला भोगावा लागू शकतो. साऱ्या प्रपंचाचा भार माझ्या एकट्यावर आहे." तरीही दुसऱ्या दिवशी सकाळी उठून रमेश रॅडिकल ह्युमॅनिस्ट कॅम्पला गेला. रमेशचे इतर भाऊ अमेरिकेत चालले असताना हा मुलगा मात्र वेगळा निघणार आहे हे सासऱ्यांच्या लक्षात आलं, पण त्यांनी त्याला कधीही विरोध केला नाही. जेव्हा रमेशने माझ्याशी लग्न करण्याचं ठरवलं तेव्हा माझ्या सासरच्या मंडळींना बहुदा महाराष्ट्रीयन माणसाला नाक आणि कान किती असतात हेही माहीत नसावं! . त्यांचे नातेवाईक मला 'दक्षिणी बहू' म्हणायचे. लाहोर सियालकोट, रावळपिंडी भागातल्या लोकांना दिल्लीच्या खालचा सगळा भाग म्हणजे दक्षिणच होता. लग्नानंतर काही वर्षांनी आम्ही दोघांनी एका दुष्काळी खेड्यात जाऊन पाच वर्षं राहायचा निर्णय घेतला, तेव्हा मला सासूबाई गंमतीत म्हणाल्या, "बेटा, जहाँ तुम्हारे पिताजी (सासरे) काम करते थे, उन देहातोंमें सुती-खादी पहने पले अपने बच्चों को मैंने अमरीका भेजा है, और अब तुम मेरे पोते को लेकर वापस गाँव जा रही हो..तुमने तो मेरा लाईफ कॅन्सलही कर दिया". आम्हा दोघींच्या खूप इंटरेस्टिंग गप्पा व्हायच्या. त्या विचारायच्या, "तुम गहने क्यूँ नहीं पहनती?" मी मुंबईची असून त्यांच्या दृष्टीने खूप साधी होते (खादी किंवा सुती कपडे परिधान करणारी, मेकअप वापरत नसलेली, लांब केस इत्यादी). लग्नाच्या अगोदर ते त्यांना खूप आवडलं होतं. पण लग्नानंतरदेखील मी तशीच राहिले तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की हा माझ्या स्वभावाचा भाग आहे. एकदा म्हणाल्या " सिंगार करना शादीशुदा लडकी के लिये अच्छा माना जाता है, अब तो मनचाहा कर सकती हो". मग मी म्हणाले की "क्या करू? मै अपनी सास पर गयी हूँ ना!" (त्या खूप साध्या राहायच्या, कधी दागिने किंवा मेकअप नाही, साधे कपडे वगैरे). त्या मनापासून हसल्या. आमच्यासाठी सासू- सासऱ्यांनी खूप ॲडजस्ट केलं हे पदोपदी लक्षात यायचं.

**सर्वंकष:** *गावात जायचा निर्णय तुम्ही कसा घेतला?*

**मनीषा:** रमेशला आणि मला स्वतंत्रपणे गावात जाऊन राहावं असं वाटत होतं. गांधी-माओ-जेपी सगळेच म्हणायचे गावाकडे जा! जेपी आम्हाला म्हणायचे, "तुम्ही मोर्च्यामध्ये जाता आणि दुसऱ्या दिवशी ठळक मथळ्यामध्ये त्याची बातमी येते. तिसऱ्या दिवशी त्या पेपरची दोन रुपये किलो अशी रद्दी झालेली असते. **भारत बदलायचा असेल तर शिकलेल्या लोकांनी थोडंसं गप्प रहावं, कान-डोळे उघडे ठेवावेत. जाऊन फक्त ऐकावं, बाहेर जाऊन बघावं परिस्थिती काय आहे आणि लोकांकडून शिकावं. तुम्ही जेव्हा लोकांकडून शिकाल तेव्हा भारत बदलेल. शहरामध्ये फक्त फेस आहे. खरा कस गावातच तर आहे!**" म्हणून आमच्या डोक्यात पूर्वीपासून गावात जायचा विचार होता. आम्ही जेव्हा लग्न करायचा निर्णय घेतला, त्यावेळेस माझं एम. एस्सी. मायक्रोबायोलॉजी नुकतंच संपलं होतं. रमेशचं केमिकल इंजिनिअरिंगमधील पीएच. डी. संपत आलं होतं. त्यावेळेस डॉ. नोशीर आंटिया नावाचं एक लोभस आणि विक्षिप्त रसायन मुंबईत होतं. ते भारतातल्या पहिल्या प्लास्टिक सर्जन्सपैकी होते. ते त्या वेळेस नट-नट्यांच्या नाकाची सर्जरी वगैरे करू शकत होते, मात्र त्यांनी कुष्ठरोग आणि जळीताच्या केसेसमध्ये हातांची नस बधीर होऊ नये अशी सर्जरी करून या क्षेत्रात मोठं काम केलं. 'आंटिया सर्जरी' म्हणून भारतातील मेडिकल कॉलेजमध्ये ती शिकवली जाते. त्यांनी अलिबागनजीक मांडवा परिसरात निरक्षर किंवा ४थी शिकलेल्या आदिवासी महिलांना गावपातळीवर कुष्ठरोगाचं निदान करायला शिकवलं. त्यांनी एकदा ठरवलं की अमुक एका माणसाला आपण Foundation of Research and Community Health (FRCH) या आपल्या संस्थेत आणायचं, की 'हो' म्हणेपर्यंत त्याच्या मागे ते हेरच सोडायचे, थांबायचेच नाहीत. खरं तर रमेशमुळे माझी आणि त्यांची १९७९ मध्ये ओळख झाली आणि शेवटी मी एम. एस्सी. पूर्ण झाल्यावर १९८२ साली FRCH मध्ये दाखल झाले. मग रमेशला FRCH मध्ये आणण्यासाठी ते माझ्यामार्फत प्रस्ताव पाठवायला लागले. त्या वेळेस (१९८२-८७) डॉ अमर जेसानी, रवी दुग्गल आणि मी ग्रामीण आरोग्यासंबंधीचे संशोधन करत होतो. आमच्या अहवालामध्ये आम्ही आरोग्यव्यवस्थेचे खाजगीकरण सुरू होत आहे असं सुतोवाच केलं, मात्र हा निष्कर्ष कोणाला फारसा आवडला नव्हता. अनेक संस्थांच्या मते लोकांना फुकट दिलेल्या आरोग्यसेवेची किंमत कळत नाही, त्यामुळे सरकारी केंद्रांत सुद्धा 'युजर फी' घेतली पाहिजे. तसेच, सरकारपेक्षा अधिक चांगल्या पद्धतीने स्वयंसेवी संस्था प्राथमिक आरोग्य केंद्रे चालवू शकतात, म्हणून सरकारने आम्हाला ती चालवायला द्यावी अशी मागणीसुद्धा जोम धरू लागली होती. अनवधानाने म्हणा किंवा छुप्या रीतीने म्हणा, सरकारी आरोग्यसेवेत खाजगी क्षेत्र येऊ लागलं! १९९० च्या दशकात नवउदारमतवादी जागतिकीकरण आलं आणि सरकारी सेवांचे खाजगीकरण उघडपणे पाहायला मिळालं.

रमेशला आंटियांनी आमिष दाखवून FRCH मध्ये १९८३ साली आणलंच. रमेशने बी. टेक. आणि एम. टेक. करण्यामध्ये तीन

वर्षांचा गॅप घेतला होता (तो घरी आर्थिक हातभार लावायला नोकरी करत होता). त्या काळात त्याने एम. ए. इकॉनॉमिक्सदेखील केलं होतं. तर डॉक्टर आंटिया त्याला म्हणाले “संपत्तीची निर्मिती आणि गरीबीची निर्मिती ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, म्हणून तू गरिबी कशी निर्माण केली जाते (creation of wealth ऐवजी creation of poverty) यावर आकडेवार मांडणी करून लिही.

काही वर्षांनी आमचे दोघांचे प्रकल्प संपत आले तेव्हा आम्ही त्यांच्याकडे गेलो आणि म्हणालो, “आम्ही दोघेही FRCH सोडत आहोत.” त्यांनी विचारलं, “असं अचानक काय झालं?” तर आम्ही म्हणालो, “आमच्याकडे भरपूर पैसे जमलेत. यानंतर आम्ही खेड्यात राहायला जाणार आहोत.” त्यावेळेस आमच्याकडे साडेबारा हजार रुपये बँकेत होते आणि आमचा पगार १०००-२००० रुपये वगैरे असा होता. त्यातून दहा टक्के चळवळीला द्यायचे आणि दहा टक्के पुस्तकांसाठी हे ठरलेलं असायचं. उरलेल्या पैशांमध्येही आमचं मस्त चालायचं. डॉ. आंटियांनी सगळं काही ऐकून घेतलं. माझं पाच-सहा महिन्यांचं गरोदर पोट पाहिलं. त्यांनी आम्हाला कॉफी करून दिली आणि म्हणाले,

“जरासा विचार करा.”

आम्ही विचलित न होता म्हणालो, “आमचा विचार पक्का आहे आणि आम्ही चाल्लोय.”

“असं जाऊ नका. एखादा छानसा प्रकल्प लिहा FRCH तर्फे आणि मग जा. तुम्हाला काय करायला आवडेल?”

‘Health Education as a Political Activity’ यावर आम्हाला काम करायला आवडेल.”

“ठीक आहे, आपण Indian Council of Medical Research (ICMR) ला प्रस्ताव पाठवू, त्यात आपण एका प्राथमिक आरोग्य केंद्राच्या क्षेत्रात सरकारी कर्मचाऱ्यांच्या मार्फत आरोग्य शिक्षण करू या, एका PHC एरिया मध्ये गावातील समुदायामार्फत आरोग्य शिक्षण करू आणि एका प्राथमिक आरोग्य केंद्राच्या क्षेत्रात कंट्रोल एरिया म्हणून संशोधन करू. प्रपोजल लिहायला सुरुवात करा.”

आम्ही त्यांचं म्हणणे मान्य केले आणि ह्या प्रकल्पासाठी आम्ही पुणे जिल्हा निवडला. आम्हाला आदिवासीबहुल तालुक्यात (तुलनेने कमी सामाजिक उतरंड असलेला समाज असल्यामुळे) काम करायचं नव्हतं. आम्हाला सर्व जाती-धर्माचे लोक, त्यांच्यातील भेदभाव आणि असमानता समजून घ्यायची होती. अशा निकषांवर आधारित पुणे जिल्ह्यात पुरंदर व इतर दोन तीन तालुके होते. पुरंदर दुष्काळी पट्टा होता. तिकडे सर्व बारा बलुतेदार होते. खूप गरिबी होती. बारामती त्यामानाने श्रीमंत होता. आपल्याला शिकायला मिळावं म्हणून आम्ही मध्यम प्रतीचे प्राथमिक आरोग्य केंद्र निवडलं आणि पुरंदर तालुक्यातील PHC असलेल्या माळशिरस ह्या खेड्यात जायचं ठरवलं. तिथे भुलेश्वर हे अकराव्या शतकात बांधलेलं, कोरीव काम असलेलं अतिशय सुंदर हेमाडपंथी देऊळ आहे. तिथे आम्ही प्रतीक एक वर्षाचा असताना गेलो आणि पाच वर्षं राहिलो. नंतर तान्ही प्रियाही आली. महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम) ची स्थापना आम्ही तिथे राहत असतांना झाली.

**सर्वकष:** *खेड्यात मुलांना वाढवताना काही ताण आला का? काही प्रश्न आले का?*

मनीषा: खूप वेगळे प्रश्न आले. म्हणजे साधारणपणे जे प्रश्न येतील असं वाटतं, ते बिलकुल आले नाहीत आणि जे अनपेक्षित होते, ते आले. आमची मुलं दिवसभर गावामध्ये फिरायची, शेतात अनवाणी हुंदडायची. आम्ही केव्हाही घरी यायचो, कधी-कधी दूरवरच्या गावांमधील मीटींग संपवून रात्री बारा वाजायचे यायला. मग मुलं शेजारीपाजारी कुठंतरी झोपलेली असायची. आम्ही त्यांना शोधत जायचो. अनेकदा पहाटे एक वर्षाची प्रिया कोणाकडे भाकरीचा वास येतोय हे शोधात जायची, त्यांच्याकडे भाकरी खायची आणि येताना ‘माझ्या आईसाठी पण द्या’ असं म्हणून एक कोर भाकर सोबत घेऊन यायची. आम्ही पाच वर्षांच्या कालावधीनंतर हडपसरला राहायला आलो, पण गावात गेलं की गावातले (गरीबातले गरीब) लोक रुमालामध्ये बाजरीचे पीठ देऊन म्हणायचे, “प्रियाला बाजरीची भाकर आवडते ताई. तिला भाकरी करून द्या घरी गेल्यावर.” अशा स्निग्ध वातावरणात ते दोघं वाढले.

अडचणी काय आल्या याबद्दल सांगायचं झालं तर समाजामध्ये सामंतशाहीची वाढ कशी होते हे आम्ही खूप जवळून पाहिलं. प्रतीक तीन वर्षांचा असताना तिकडच्या सहा वर्षांच्या मुलांपेक्षा तो उंच होता आणि धष्टपुष्टदेखील. त्याच्या वयाच्या दुप्पट वयाची मुलंसुद्धा त्याला प्रतीकदादाच म्हणायची. पळताना प्रतीक सर्वात पुढे असायचा. त्याच्या मागे बाकीची मुलं असायची. शाळेमध्ये त्याला ज्या मुलांनी सकाळी पकडलं त्या वर्गात तो जाऊन बसायचा. तिसरीवाल्यांनी पकडलं तर तिसरीत जाऊन बसायचा, सहावीवाल्यांनी पकडलं तर सहावीत. बालवाडी सोडून सगळीकडे असायचा. तो सकाळी चांगला नाश्ता करून जायचा. वर्गातली मुलं अनेकदा कोरा चहासुद्धा पिऊन आलेली नसत. अशा स्थितीत दीड वाजता तुम्हाला गणित कसं जमेल जर तुमच्या पोटात काहीच नसेल? हे बघणं आमच्यासाठी खूप

हृदयद्रावक होतं. गुरुजी त्यांची भाकरी आणि मटकी सर्वांच्या समोर प्रतीक बरोबर शेअर करायचे, "डॉक्टरांचा मुलगा बघा किती हुशार, नाहीतर तुम्ही..!" असं म्हणायचे. साडेतीन वर्षांचा असतांना प्रतीक सकाळीच घरी परत आला. त्याचे डोळे भरलेले होते. "काय झालं बाळा?" असं विचारल्यावर बोलला की, "आज गुरुजींनी माझ्या हातात छडी दिली आणि म्हणाले, जे गणित करत नाहीत त्यांना मारायचं. मी नाही करू शकणार ते, मला नाही जायचं त्या वर्गात". एकदा आमची मुलं बाहेर खेळताना पाहून गरीब मराठा घरातील एक बाई मला म्हणाली "ताई, बारा बलुत्यांमध्ये आपली पोरं कशापायी खेळतात?" अशा पद्धतीने समाजात सामंतशाहीचे, जातीव्यवस्थेचे, पितृसत्तेचे, गरीबीचे आणि असमानतेचे पुनरुत्पादन होताना छोट्या छोट्या घटनांमधून पाहायला मिळालं. उतरंडीवर आधारित समजामध्ये जमीनजुमला असलेल्या 'प्रतिष्ठित' घरातील मुलांनी मोठं झाल्यावर इतरांवर अधिकार गाजवला नाही तरच आश्चर्य मानावं, नाही का?

आम्ही पुरंदर तालुक्यात ६ एप्रिल १९८७ मध्ये राहायला गेलो, तो जागतिक आरोग्य दिन होता (हे मात्र नंतर ध्यानात आले). मे महिन्यामध्ये लग्नाचा हंगाम होता. आमच्या घरासमोरच एक मोठं पटांगण होतं. तिथे बरीच लग्नं व्हायची. लग्न लागलं की त्याच जागेवर लागलीच जेवणाची पंगत बसायची. दोन चार लग्नं झाली, पण आम्हाला मात्र अक्षता पडल्यानंतर कोणीच जेवायला बसायला सांगितलं नाही. स्वाभाविकरीत्या आम्ही थोडं खजील झालो, पण आम्ही त्याबाबत एकमेकांशीसुद्धा काही बोललो नाही. घरी काही बनवलेलं नव्हतं. परत आल्यानंतर रमेशने खिचडी बनवली, लहानग्या प्रतीकला मी दूध वगैरे गरम करून दिलं. दोन दिवसानंतर परत एक लग्न होतं, आम्ही थोडं थांबून घरी परतलो. थोड्या वेळाने एक लहान मुलगा आला. त्याच्या हातामध्ये परात होती, त्याच्यामध्ये रवा, साखर, तूप वगैरे ठेवलं होतं. मी उत्साहाने विचारलं, "बाळा मी शिरा करून देऊ का?" मला असं वाटलं की ह्या मार्गाने तरी आम्हाला गावाचा भाग बनता येईल. त्याला काहीच कळेना. त्याने ते साहित्य माझ्या हातात दिलं आणि पळून गेला. मला काहीच कळले नाही. ताट तसंच ठेवून दिलं. शिरा करू की नको हे कळत नव्हतं. दोन दिवसांनी परत तिथे एक लग्न होतं, परत एका मुलाने तशाच प्रकारे साहित्य आणून दिलं. तेव्हा मात्र आम्हाला कळलं की ते 'कच्चा शिधा' आणून देत आहेत! 'तुमचं तुमच्या हाताने शिजवून खा' ह्या अर्थाने. मी त्याला विचारले की तुझ्या घरच्या लोकांपैकी कोणाशी तरी मी बोलू का? लगेचच त्या मुलाचे (आणि वधूचे) वडील मंडप सोडून घरी धावत आले.

"काय ताई, काय झालं?"

"हे बघा, आम्ही तुमच्या गावात प्रेमाने राहायला आलो आहोत, तुम्ही अस्पृश्यता का पाळताय?"

"नाही हो. आम्ही असं कसं करू शकतो?"

"मग आम्हाला तुमच्याबरोबर पंगतीत बसवा, असं मागे अन्न पाठवू नका."

त्यानंतर आम्हाला प्रत्येक जातीच्या लग्नात मातीत, जमिनीवर बसून पंगतीत बसायचं प्रेमपूर्वक आमंत्रण मिळू लागलं. आम्ही गावकऱ्यांच्या जवळ पोहोचत आहोत याची जाणीव आणि आनंद अनुभवला. जात, पितृसत्ता, वर्गव्यवस्था अशा वेगवेगळ्या प्रकारच्या विषमता आम्ही त्या पाच वर्षांत जवळून पाहिल्या. मी त्या काळाला आमची Three Dimensional University असं म्हणते. शहरात मध्यमवर्गीय आयुष्य जगात असताना सूक्ष्म अनुभवांचा लवकर उलगडा होत नाही. लोकांमध्ये राहून त्याचा अर्थ कळायला मदत होते हे लक्षात आलं.

**सर्वंकष:** *त्यांना असं वाटत होतं की तुम्ही त्यांच्यात जेवणार नाहीत की त्यांना तुम्हाला जेवू घालायचं नव्हतं, कसं होतं ते?*

मनीषा: आम्ही जेवणार नाही असं त्यांना वाटायचं. आम्ही पंगतीत जेवायला लागल्यानंतर लोक विचारायचे की "तुम्ही तर जेवता, मग इतर (सवर्ण / ब्राह्मण) कुटुंबं का जेवत नाहीत? आम्ही म्हटलं की "तुम्ही त्यांना प्रेमाने आमंत्रण द्या, त्यांच्यापैकी एखाद्याला जेवायचं असेल. आणि नाही म्हणाले तर त्यांचा दुटप्पीपणा लक्षात येईल". आम्ही पुरोगामी चळवळीचा वारसा घेऊन तिथे गेलो होतो. यामुळे आम्ही ठरवलं होतं की जिथे दलित, बलुतेदार, गरीब समूह राहतात त्या 'खालच्या' वेशीतूनच गावात काम सुरू करायचं, तिथूनच कार्यकर्ते निवडायचे. आम्ही कधीही सरपंच किंवा पोलीस पाटील यांच्या घरात मीटिंग घ्यायला गेलो नाही.

तो भाग दुष्काळी असल्यामुळे साधे स्वच्छ पाणीसुद्धा लोकांकडे नसायचं. चहा तर सर्वात महाग होता. कारण चहा बनवण्यासाठी सर्वच - साखर, चहापत्ती, दूध, स्टो पेटवण्यासाठी रॉकेल विकत घ्यावं लागायचं. दुष्काळी भागात हातात पैसा कुठून येणार? पाहुणे आल्यावर चहा ठेवला की आपल्याला कधी मिळेल याची वाट बघत घरातील सगळी मुले स्टोव भवती रिंगण करून बसायची. इतक्या गरीब परिस्थितीत कोणी चहा बनवून आणतात तेव्हा तुम्ही नाही म्हणूच शकत नाही.

तिथे गेल्यानंतर पहिलं दीड वर्ष आमच्याकडे गाडी नव्हती. त्यामुळे आम्ही एसटी बसने, बैलगाडीने, चालत किंवा सायकलीवर प्रवास करायचो. मग संस्थेने आम्हाला गाडी दिल्यानंतर मी गाडी चालवू लागले. त्यावेळेस एक स्त्री गाडी चालवत असताना मराठी

भाषा न येणारा पुरुष/नवरा बाजूला बसलेला आणि त्याच्या मांडीवर एक लहानसा मुलगा अशी आमची वेगळी वरात निघायची. कधीकधी बाई अंगावर गाडी घालेल या भीतीने लोक डोक्यावरच्या मोळ्या टाकून रस्त्यावरून पळायचे. आमच्या गावाच्या खाली १२ किलोमीटर घाट उतरून आल्यावर सोलापूर रोडवर यवतमध्ये बरं चालणारं प्राथमिक आरोग्य केंद्र होतं. तिथे मी अनेकदा पेशंट नेले आहेत. अनेकदा वाटेवर एखादी अडलेली गरोदर तरुणी दिसली की रमेश प्रतीकला घेऊन उतरायचा आणि झाडाखाली थांबायचा. मी मुलीला आणि तिच्या सोबत असलेल्या आई-सासूला सुरक्षित आरोग्यसेवेपर्यंत पोहोचवून परत यायचे आणि मग आम्ही घरी जायचो. जेव्हा तुमच्या जीपमध्ये कोणीतरी मरतं, किंवा तुमच्या जीपमध्ये काळोख्या रात्री एखादं मूल जन्माला येतं, तेव्हा तुम्ही खूप आतून बदलता. अंगावर येणारे असे खूप अनुभव त्या पाच वर्षांत आले.

**सर्वंकष:** *तुम्ही आरोग्य विषयात बरंच काम केलेलं आहे. जवळपास २०-२५ वर्षांपूर्वी तुम्ही 'रॅडिकल जर्नल ऑफ हेल्थ' हे जर्नल सुरू केलं. आरोग्य, समाज आणि राज्यसंस्था या तिघांच्या परस्परसंबंधाची खूप चांगली चर्चा त्यात होत होती. नंतर काही कारणांमुळे ते बंदही झालेले दिसतं. तर ह्या जर्नलसोबतच्या तुमच्या प्रवासाबद्दल आम्हाला सांगा. ज्या वेगवेगळ्या संस्था तुम्ही काढल्या किंवा ज्या संस्थेशी तुमचा संबंध आहे त्यांमध्येही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या शारीरिक, सामाजिक किंवा मानसिक आरोग्य जोडलेलं आहे. मासूम, सेहत, मेडिको फ्रेंड सर्कल या सगळ्या संस्थांशी तुमचा जो संबंध आहे, याविषयी थोडं सांगाल का?*

**मनीषा:** 'मासूम' आणि 'सेहत' या संस्था सुरू करण्यामध्ये मी होते. 'रॅडिकल जर्नल ऑफ हेल्थ' सुरुवातीला 'सोशॅलिस्ट हेल्थ रिव्ह्यू' या नावाने प्रसिद्ध व्हायचं. आम्ही १९८४ साली ते सुरू केलं. अमर जेसानी, रवी दुग्गल, पद्मा प्रकाश आणि मी - असे चौघं त्याचे संपादक होतो. त्यानंतर त्याचं रजिस्ट्रेशन करताना 'सोशॅलिस्ट हेल्थ' नावाचं जर्नल कोणाकडे तरी असल्यामुळे आम्हाला त्याचं नाव बदलून 'रॅडिकल जर्नल ऑफ हेल्थ' करावं लागलं. ते आम्ही सहा एक वर्ष चालवलं. त्यामध्ये अनंत फडके, बिनायक सेन असे अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते सल्लागार संपादक होते. माझी स्वतःची खूप वाढ त्या काळात झाली. त्याच्या आधीपासून (१९७४) 'मेडिको फ्रेंड सर्कल' (MFC) सुरू करण्यामागे अभय बंग, उल्हास जाजू, अशोक भार्गव इत्यादी होते. 'तरुण शांती सेने' तून मेडिको फ्रेंड सर्कल सुरू झालं. १९८० सालापासून मी त्याच्यात ॲक्टिव्ह राहिले ती आजपर्यंत. तीस वर्षं मी MFC चे अधिकृत कार्यालय राहत्या घरातून सांभाळले.

मुंबईच्या स्त्रीवादी चळवळीमध्ये पुरंदर तालुक्यात जाईपर्यंत मी १९८७ सालापर्यंत (२९-३० वर्षांची होईपर्यंत) राहिले. त्यावेळेस स्त्रीवादी चळवळीची सुरुवात शासनाकडून आणि कुटुंबाकडून होणाऱ्या हिंसाचाराच्या प्रश्नाला घेऊन सुरू झाली. नंतर आरोग्याबद्दलसुद्धा बोललं जाऊ लागलं. माझं मायक्रोबायोलॉजी बॅकग्राऊंड होतं. त्यामुळे मी कॉलेजमध्ये मेडिकल मायक्रोबायोलॉजी आणि इम्युनोलॉजी हे अनौपचारिकरित्या शिकवायचे. गर्भलिंगनिदानाच्या चाचण्या, महिलांच्या शरीरावर धोकादायक गर्भनिरोधकांचा होणारा परिणाम, सरकारचे गरीब आणि स्त्रीविरोधी लोकसंख्या नियंत्रणधोरण ह्या बाबतीत मुंबई, दिल्ली, बंगलोर अशा अनेक ठिकाणी चर्चा सुरू झाल्या होत्या. त्यामुळे आम्ही आपसूकच या चर्चेचा भाग झालो होतो. एका बाजूला M. Sc. चे संशोधन, दुसऱ्या बाजूला चळवळ आणि त्या चळवळीला आरोग्याचं भान, असं खूप सकस वातावरण मुंबईमध्ये तयार झालं होतं. त्याच्यातून आरोग्य आणि त्याचा राजकीय पैलू म्हणजे 'पॉलिटिक्स ऑफ हेल्थ' हे स्पष्टपणे पुढे आलं. त्याच्यातूनच खरं तर आम्ही 'राजकीय काम म्हणून आरोग्य शिक्षण' (Health education as a political activity) करायचं ठरवलं होतं.

आम्ही लहान असताना मोठया आजारासाठी प्रायव्हेट हॉस्पिटलला कधी गेलो असू असं फारसं आठवत नाही. सरकारी हॉस्पिटलच्या ओपीडीला जात नसायचो, तिकडे गरीबवर्ग जायचा. मध्यमवर्गाचा 'फॅमिली डॉक्टर' असायचा. मात्र, आमच्या घरातल्या सर्वांची ऑपरेशन्स मुंबईच्या सायन हॉस्पिटल, के. ई. एम. हॉस्पिटल, जे. जे. हॉस्पिटल अशाच ठिकाणी झाली होती. . तेव्हा सरकारी आरोग्य यंत्रणा एवढी कोलमडलेली नव्हती. सर्वात चांगले डॉक्टर सरकारी दवाखान्यात असायचे. ही यंत्रणा १९९० च्या दशकात मोडकळीस यायला लागली. त्यानंतर ती पूर्णतः उद्ध्वस्त झाली. **इंग्रजीमध्ये अशी म्हण आहे की ' कुत्र्याला गोळी घालण्यापूर्वी तो पिसाळला असल्याचं जाहीर करावं लागतं.' (Declare a dog mad before you shoot him.) त्यामुळे सरकारी आरोग्यसेवा किंवा सरकारी शाळा चालत नाहीयेत हे दाखवलं की तुम्ही त्यांचं खाजगीकरण करू शकता. आज सगळ्यात जास्त नफा शिक्षण आणि हॉस्पिटल ह्यांमध्ये आहे आणि यामध्येच तुम्हाला खाजगी क्षेत्राचा सर्वाधिक हस्तक्षेप दिसून येईल.** तीच बाब विम्याची, विशेषतः आरोग्य विम्याची आहे. आम्ही आरोग्याच्या चळवळीत उतरलो तेव्हा खाजगीकरणाच्या प्रक्रियेची चाहूल लागली होती. पुरोगामी, स्त्रीवादी आणि डाव्या विचारसरणीच्या नजरेतून आरोग्य या विषयाकडे बघणं मला या काळात उमगलं, आणि त्याची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर समीक्षा करणारे स्त्रीवादी आणि आरोग्य चळवळीतील अनेक

कार्यकर्ते भेटले.

आम्ही आरोग्य शिक्षणाचाच प्रकल्प घेऊन गावाकडे गेलो होतो. त्यामुळे स्वाभाविकरीत्या आमची सुरुवात आरोग्याच्या प्रश्नापासून झाली. त्याच्यामधून मासूमचा 'स्त्रीधन विकास प्रकल्प' नावाचा कर्ज देण्याचा प्रकल्प उभा झाला त्यामागचं कारण असं की लोक आरोग्याच्या गरजांसाठी सर्वात जास्त कर्जबाजारी होताना दिसले. त्यावेळेला गावामध्ये सावकाराचा व्याजाचा दर महिन्याला १२% (म्हणजे वर्षाला जवळपास १५०%) असा होता. त्या कर्जबाजारीपणाकडे पाहून आम्ही स्त्रीधन विकास प्रकल्प सुरू केला. त्याचबरोबर महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराबद्दल अधिक काय बोलायचं? संघर्ष वाहिनीच्या अंतर्गत मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये काम करताना समाजवादी स्त्रीवादाचं (सोशॅलिस्ट फेमिनिझमचं) अंग तर होतंच. त्यामुळे हिंसाचार, महिलांचे अधिकार आणि आरोग्य या त्रिकोणामध्ये जे-जे सापडत गेलं, ते-ते आम्ही करत गेलो, काही जमलं, काही जमलं नाही.

**सर्वंकष:** *त्या अर्थाने स्त्रीचं शरीर तुमचा कामाच्या केंद्रस्थानी होतं आणि मग ते सगळीकडे जोडलं गेलं.*

**मनीषा:** बरोबर आहे. जहाल स्त्रीवादाने (Radical feminism) शरीर आणि लैंगिकता ह्यांच्याबद्दल खूप काही शिकवलं. पण त्याचे उपयोजन, ॲप्लीकेशन शिकवलं ते सोशॅलिस्ट फेमिनिझमनेच.

**सर्वंकष:** *हे अजून विस्ताराने सांगाल का?*

**मनीषा:** आम्ही स्वतःला समाजवादी स्त्रीवादी मानत असलो तरी अनेकदा उदारमतवादी स्त्रीवादाच्या (लिबरल फेमिनिझम) मार्गाने काम करत होतो - कायदे-धोरणं यामध्ये बदल करण्याबाबत आम्ही बोलायचो. विषमता भेदभाव जिथे-जिथे दिसले, त्या-त्या ठिकाणी कायद्याच्या मदतीने आम्ही त्याचा मुकाबला केला. महाराष्ट्र शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या धोरणनिर्मितीच्या पातळीवर मी अनेकदा सहभागसुद्धा घेतला. मात्र दुष्यंतकुमार म्हणतात त्याप्रमाणे "आज ये दीवार पर्दो की तरह हिलने लगी; शर्त लेकिन थी कि ये बुनियाद हिलनी चाहिये". समाजवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद ह्यांचं खरंतर हेच काम आहे – व्यवस्था बदलण्याचं. जहाल स्त्रीवादात शरीर हे केंद्रस्थानी होतं. त्यात त्या अर्थाने Biological essentialism देखील होतं. म्हणजे शरीरामुळे स्त्रीचं दमन होतं असं मानणं. अशा प्रकारचं साहित्य मी खूप वाचायचे. शरीरावर आणि स्त्रीआरोग्यावर भाष्य करणारं 'Our Bodies Ourselves' हे पुस्तक तर डोक्यावर घेऊन नाचावं अशा पद्धतीचं होतं. बाळंतपण नैसर्गिक आणि सुरेख असू शकतं यावर माझा विश्वास त्या पुस्तकामुळेच बसला. त्यातूनच मी माझ्या बाळंतपणामध्ये येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्यास शिकले. माझ्या बाळाचा जन्म होत असताना माझी गायनॅकॉलॉजिस्ट मला हसत हसत म्हणाली, " यू आर नॉट सपोज्ड टु एन्जॉय धिस!" '. त्या पुस्तकामुळे मला माझ्या शरीराची लाज वाटेनाशी झाली. मात्र जहाल स्त्रीवादात जो इसेन्शियालिझम आहे की पुरुष हा मूलतःच आपला शत्रू आहे, ते पटण्यासारखं नव्हतंच. 'शरीर ही आपली नियती आहे' (Body is my destiny) म्हटल्यावर मग काय करायचं? पुरुषांना रांगेत उभे करून त्यांच्यावर गोळ्या झाडायच्या ? पुरुष, महिला, इंटरसेक्स, ट्रान्सजेंडर व्यक्ती – संपूर्ण मानवजाती आपल्या गर्भाशयातूनच येते ना? दुसऱ्या ग्रहावरून तर येत नाहीत ना? मुलगा जन्मतः हिंसक असतो का? मुलगी जन्मतः सहनशील असते का? तर नाही. पण ह्या विचारधारेने मला शरीर, लैंगिकता ह्यांच्याकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली, हे मान्यच करायला हवं.

**सर्वंकष:** *ग्रामीण स्त्रियांच्या बाबतीत शरीर केंद्रस्थानी येतं, कारण ग्रामीण स्त्रियांच्या शरीराचा खूप दुरुपयोग होतो असं मला वाटतं. मी ज्यावेळेस ग्रामीण विद्यालयात शिकवत होते त्यावेळेस मला हे जास्त जाणवलं. त्या मुलींचं कुपोषण होतं. याचा संस्थात्मक अभ्यास तुम्ही केला. त्यातून या शरीराकडे बघण्याचा त्या स्त्रियांचाच दृष्टिकोन बदलणं आवश्यक आहे, असं तुम्हाला वाटलं होतं का?*

**मनीषा:** हो, होतं! पण शरीर म्हणजे निव्वळ पोकळी नाही. सबला आणि क्रांती या मैत्रिणींनी दिलेल्या दीर्घ प्रशिक्षणाच्या नंतर आम्ही Internal speculum self-examination करण्यास महिलांना प्रोत्साहित केलं. (उशीला टेकून बसणे आणि दोन पायांत आरसा धरून, हातात टॉर्च धरून स्पेक्युलम ह्या उपकरणाच्या सहाय्याने योनीच्या अंतर्भागाची स्वतः तपासणी करणे.) दर महिन्याला स्वतःच्या छातीची तपासणीसुद्धा करायला शिकवलं. त्यातून स्त्रीला स्वतःच्या शरीराबद्दल वाटणारी लज्जा दूर होण्यास मदत झाली. ह्या कृतीतून जो मुक्तीचा अहसास मिळतो, तो विलक्षणच असतो! माझ्या ग्रामीण मैत्रिणींनी ते साध्य केलं. (हाच अनुभव डॉ. मीरा सद्गोपाल ह्यांना म. प्र. तील पिपरिया ह्या सुदूर क्षेत्रातील महिलांसोबत काम करताना, आणि दिल्लीत वस्त्यांमधील महिलांच्या बाबतीत Action India या संस्थेला आला. – सं.) पण शहरातील मध्यमवर्गात असं करणारी कोणी व्यक्ती सहज सापडेल असं वाटत नाही. मला २००१ साली ब्रेस्ट कॅन्सर झाला होता तेव्हा जगभरातून खूप प्रेम आणि आपुलकीने लोकांनी भावना व्यक्त केल्या, फुलं-चॉकलेट पाठवली, भेटायला आले, ई-मेल पाठवले. तुझ्यासाठी आम्ही काय करू शकतो म्हणून

विचारलं. मी विचार केला - काय करावं बरं? मला वाटलं की मॅमोग्राम करून घ्यावा सगळ्यांनी. कारण तेव्हा त्या मैत्रिणीही माझ्यासारख्याच चाळिशीच्या आसपास होत्या. माझ्या त्या सहा-आठ महिन्यांच्या ट्रीटमेंटमध्ये २०० च्या वर लोकांनी मॅमोग्राम्स केल्याचं मला सांगण्यात आलं. पण माझी आई लवकर गेल्यानंतर आईसारखं प्रेम देणाऱ्या माझ्या नात्यातली एकही महिला तयार झाली नाही. त्या अर्थाने ग्रामीण स्त्री शरीर आणि लैंगिकतेच्या बाबतीत खूप मोकळी आहे. लैंगिकतेबद्दल तिने स्वतः होऊन सुरुवात जरी नाही केली, तरी एकदा विषय सुरू झाला की अक्षरशः जबरदस्तीने दुसरा विषय सुरु करावा लागतो हा माझा अनुभव आहे. मी गावात राहायला गेले तेव्हा तिकडच्या बायांनी ओळखलं की हे येडं काम आहे, सगळं ज्ञान शाब्दिक आहे, अनुभव काही नाही, आणि नुसती बोलभांड आहे. त्यांनी मला पहिल्या दहा दिवसांमध्येच ओळखलं असेल जेव्हा मी वयस्क महिलांचे दाई प्रशिक्षण करायचे. मी काही माहितीपर बोलले की कानाआड करायच्या. माझ्यावर उपकार केल्यासारखं म्हणायच्या, 'आम्ही येतो कशापायी माहित आहे का? तू बोलते ना, ते सगळं बेकारवाणी आहे. बाळंतपण कसं करतात आम्हाला माहीत आहे. पांडुरंगाच्या कृपेने आजवर एकही बाई मेली नाही आमच्या हातून! फक्त तू लई गोड आहेस म्हणून आम्ही येतो'. एकदा अडलेली बाई गावातून यवतला नेत असताना अचानक जीपमध्ये त्या अंधाऱ्या रात्री, घाटाच्या वळणावर बाळाची डिलिव्हरी सुरू झाली. दगड लावून जीप थांबवली आणि जीपच्या हेडलाईट मध्ये बाळंतपण करण्यासाठी मी आणि आरोग्य सेविका प्रयत्न करू लागलो. मूल पायाळू निघालं. पाय आणि अंग बाहेर आलं. हात जेमतेम आले, पण डोकं काही बाहेर निघेना. अशा परिस्थितीत काय करावं हे मला तरी कुठे माहीत होतं? 'आज खऱ्या अर्थाने sisterhood आजमावायचं – मेलो तर सगळ्यांनी एकत्र मरायचं' असा विचार करून त्या कच्च्या घाटावरून ताशी ७० किलोमीटर वेगाने गाडी पळवली. मी गाडी इतकी वाईट चालवली असणार की बिचारं शहाणं बाळ स्वतःहून बाहेर आलं. रडण्याचा इतका गोड आवाज मी आयुष्यात ऐकला नाही. नाळ कापायलादेखील आम्ही थांबलो नाही. घाटाखाली सरकारी दवाखान्यात एकदाचे पोहोचलो. मी दाई प्रशिक्षणाच्या पुढच्या बैठकीत हा सगळा घटनाक्रम सांगितला. सगळ्या म्हाताऱ्या सुईणी खो खो हसल्या. म्हणाल्या, "तू येडी का खुळी, एवढं तुला येत नाही का?" मग पायाळू मुलाचं अडकलेलं डोकं हलक्याने बाहेर कसं काढायचे हे त्यांनी मला सांगितलं. मला काही येत नाही ही त्यांची धारणा पक्की झाली आणि मग मी सगळ्या विनोदांचं केंद्रस्थान बनले . मी जे काही बोलायचे, त्या प्रत्येक गोष्टीचा त्या बाया लैंगिक अर्थ काढायच्या. जणू काही ठरवल्यासारखं, . प्रत्येक गोष्टीचं उत्तर त्या लैंगिकच द्यायच्या. त्यांच्यासोबत राहून-राहून काही दिवसांनी मीदेखील त्यांच्यासारखं बोलायला लागले आणि त्यानंतर मी त्या 'वुमेन्स ग्रुप'चा भाग झाले, त्याअगोदर मी 'गर्ल्स ग्रुप'चा भाग होते. माझा खरा स्वीकार हा लैंगिकतेच्या चर्चांमुळे झाला.

बाईचं शरीर कुपोषण, अनियमित आहार, अनारोग्य इत्यादी समस्यांमध्ये अडकलेलं असतं. जात-वर्ग हे वास्तव मला पूर्वी वाचनातून माहित होते, पण गावातील महिलांच्या सोबत काम करायच्या आधी त्याचे विविध पैलू उमजत नव्हते. शरीर जात, वर्ग, लैंगिकता, विकलांगता अशा चौकटीत कसं समजून घ्यायचं हे आपल्यापुढे असलेलं मोठं आव्हान आहे. एलजीबीटी, विकलांग महिला, आणि वेश्याव्यवसाय करणाऱ्या व्यक्तींच्या चळवळीतून मला खूप शिकायला मिळालं. जोपर्यंत घराच्या आत आणि बाहेर असमानता आहे, तोपर्यंत कोणीच मुक्त होऊ शकत नाही. पितृसत्ता अनेक जटिल व्यवस्थांशी जोडलेली आहे, या भूमिकेतून समाजवादी स्त्रीवाद विचार करतो. ह्यातून माझा आरोग्याकडे बघण्याचा दृष्टिकोन समृद्ध झाला.

**सर्वंकष:** *आंतरप्रवर्गीयता (intersectionality, उदा.; जात, वर्ग, लिंगभाव ह्यांचा परस्परसंबंध) ह्याचा खरा अर्थ तिथेच तुम्हाला कळला, असं म्हणता येईल का?*

**मनीषा:** आपण जात, वर्ग आणि लिंगभाव ह्यांना महिलांवर असलेले 'डबल बर्डन, ट्रिपल बर्डन' असं म्हणतच होतो. सत्तरच्या दशकातल्या स्त्रीवादी चळवळीमध्ये केवळ स्त्रियांचे प्रश्न घेऊन काम करणारे कार्यकर्ते नव्हते, तर आपल्यापैकी बहुतांश लोक पुरुषसत्तेला टक्का देत असतांना व्यापक विचार करणारे डावे, मध्यममार्गी व गांधीवादी विचारसरणींचे होते. त्यामुळे शासनाकडून होणारी हिंसा (महाराष्ट्रात पोलिस ठाण्यामध्ये मथुरा या आदिवासी मुलीवर केलेला सामूहिक बलात्कार, उत्तर प्रदेशात पोलिसांनी माया त्यागींच्या कुटुंबातील पुरुषांना मारून टाकून त्यांची काढलेली नग्न धिंड, आंध्रप्रदेशमध्ये रमीझाबींवर पोलिसांकडून बलात्कार करून त्यांच्या हातगाडी चालवणाऱ्या नवऱ्याचा केलेला खून), आणि अत्याचार आपल्याला पटकन कळले. त्यानंतर मंजुश्री सारडा यांचा कुटुंबियांनी हुंड्यासाठी केलेला खून उघडकीस आला. ह्या सगळ्या घटनांवरून हिंसाचाराची 'इंटरसेक्शनॅलिटी' लक्षात आली होती. पुढे जाऊन वंचित समूहातील महिला कार्यकर्त्यांनी त्या-त्या गटाचे प्रश्न उचलायला सुरुवात केली तेव्हा त्यातले बारकावे समजू लागले.

**सर्वंकष:** *किंबर्ली क्रेनशॉ यांच्याबद्दल 'पुरुष स्पंदनं' दिवाळी अंकात तुम्ही जो लेख लिहिलेला आहे, त्याबद्दल विचारते. भारतीय*

*आणि पाश्चात्य स्त्रीवाद आताच्या काळात वेगवेगळ्या प्रकारे बहरत जाऊन जास्तीत जास्त भेदक होत आहेत असं तुम्हाला वाटतं का? आपला स्त्रीवादी विचार किंवा चळवळ ह्या सगळ्या आकलनापर्यंत पोहोचलीय का?*

**मनीषा:** हे दोन वेगळे मुद्दे आहेत. त्यामुळे मी पहिल्यांदा किंबर्ली क्रेनशॉ व पॅट्रीशिया कॉलिन्स या अमेरिकन कृष्णवर्णीय विदुषींबद्दल आधी बोलते. किंबर्ली कायद्याच्या आणि पॅट्रीशिया समाजशास्त्राच्या प्राध्यापक आहेत. त्यामुळे त्यांची मांडणी वेगळ्या अंगाने होताना दिसते, आणि तरीही एकमेकींच्या सिद्धांतांना पुष्टी देणारी ठरते. माझा समाजशास्त्रातील पीएच. डी.चा विषय जात आणि पितृसत्ता यांच्यामध्ये असलेली इभ्रतीची संकल्पना समजून घेणारा होता. मला या दोघीजणी फार महत्त्वाच्या वाटल्या. किंबर्ली ज्या आंतरप्रवर्गीयतेबद्दल बोलते (आम्हा दोघींची घट्ट मैत्री असल्यामुळे 'ती' असे संबोधन करत आहे) ते अंतर्भावाच्या (inclusion) पातळीवर नाही तर ती वगळणुकीच्या (exclusion) पातळीवर बोलते. आपण जातिव्यवस्था, पितृसत्ता, धर्मव्यवस्था इत्यादींचा एकत्रितपणे विचार झाला पाहिजे अशी मांडणी करतो. परंतु किंबर्ली वगळणुकीबद्दल बोलताना असं म्हणते की **एका चौकामध्ये एका कृष्णवर्णीय बाईचा अपघात होऊन खूप रक्तस्राव होतोय आणि ती मरणाच्या दारात, रस्त्यावर पडलेली आहे. ॲम्बुलन्सला बोलावलं जातं. पहिली ॲम्बुलन्स स्त्रीवादी चळवळीची येते आणि "ही तर कृष्णवर्णीय आहे!" असं म्हणत निघून जाते., त्यानंतर कृष्णवर्णीयांच्या चळवळीची ॲम्बुलन्स येते. ती म्हणते, "ही तर स्त्री आहे!" आणि तीही निघून जाते. आणि तिसरी ॲम्बुलन्स " ही नक्की गरीब आहे का हे समजत नाहीये" असं म्हणत निघून जाते. बाई मात्र रक्ताच्या थारोळ्यात तशीच पडून राहिलेली असते. किंबर्लीचा प्रश्न असा आहे की जीवन मरणाचा प्रसंग असूनसुद्धा ह्या बाईला कोणत्याही ॲम्बुलन्समध्ये घेतलं का जात नाही? याचं कारण असं की अमेरिकेतली स्त्रियांची चळवळ ही प्रामुख्याने गोऱ्या महिलांची चळवळ आहे, आणि कृष्णवर्णीयांची चळवळ ही प्रामुख्याने पुरुषांची राहिलेली आहे.** या आंतरप्रवर्गीयतेमध्ये कृष्णवर्णीय महिलेचे प्रश्न व तिचे नेतृत्व मागे पडतात. किंबर्ली ही वकील असल्यामुळे ती कायदेशीर पद्धतीने वगळणुकीचा विचार करते. किंबर्लीच्या ह्या सर्व प्रश्नांचे भारतीयीकरण केल्यास हे उदाहरण दलित, मुस्लिम, आदिवासी, भटके विमुक्त समूहातील स्त्रियांची वगळणूक समजायला तंतोतंत लागू पडतं. किंबर्ली पाश्चिमात्य स्त्रीवादी चळवळीला एक प्रक्षोभक प्रश्न विचारते: तुम्ही बलात्काराच्या विरुद्ध आंदोलन करताय. पण आम्ही तुमच्या आंदोलनामध्ये सहभागी का व्हावं, याचं एक तरी कारण सांगा. जवळपास साडेतीनशे वर्ष गुलामीत असलेल्या आमच्या महिलांवर बलात्कार होत होते. कोण करत होतं हे बलात्कार? तुमचे (गौरवर्णीय) पुरुषच करत होते, पण गेल्या तीनशे वर्षांत आमच्यावर झालेल्या अत्याचारासाठी 'बलात्कार' हा शब्द का वापरला गेला नाही? जर याचा उहापोह तुम्ही केला नाही तर आजही तुम्ही गोऱ्या महिलांच्या बलात्काराबद्दलच बोलताय, आमच्याबद्दल नाही. पुढे जाऊन किंबर्ली म्हणते की गौरवर्णीय बाईकडे नुसतं डोळे वर करून पाहिलं तरी आमच्या पुरुषांचा झुंडशाहीने खून (लिंचिंग) केला जायचा. आज तसं उघडपणे करता येत नाही. गतिशीलते (मोबिलिटी) मुळे आता तुम्ही आणि आमचे पुरुष भेटायला लागला आहात. मग तुमच्या हे लक्षात येत नाही का की यातील एक अंश हा तुमच्या लैंगिकतेवर असलेल्या तुमच्या पुरुषांच्या नियंत्रणाबद्दल आहे, आणि आमच्या पुरुषांविषयी तुमच्या समूहात असलेली मनात असलेली भीती आहे. तुमच्या पुरुषांकडून आमच्या महिलांवर झालेला (आणि होत असलेला) अत्याचार बलात्काराच्या संज्ञेमध्ये येत नाही, जोपर्यंत आपण बलात्कार ह्या संज्ञेची पुनर्रचना करणार नाही, त्या संज्ञेमधून कृष्णवर्णीय महिलांची वगळणूक झाल्याचे समजून घेणार नाही, तोपर्यंत आम्हाला या आंदोलनांमध्ये भाग घेण्यात रस नाही. हा प्रश्न तुमच्या लैंगिकतेवरील नियंत्रणाचा आहे, माझ्या नाही. याबद्दल तुम्ही बोलायला तयार आहात का? तरच आम्ही आमच्या दृष्टिकोनातून बलात्काराबद्दल बोलू आणि तुम्ही जे बोलताय त्याच्यापेक्षा ते पूर्णतः वेगळं असेल.

किंबर्ली अशा वगळणुकीबद्दल बोलते आहे, ते राजरोसपणे मुस्लिम समूहाचं (बिल्किस बानोवर बलात्कार करणाऱ्या आणि तिच्या संपूर्ण कुटुंबाची हत्या करणाऱ्या अपराध्यांची ७५ व्या स्वातंत्र्यदिनी सुटका करणं आणि त्यांची आरती ओवाळली जाणं; आंतरधर्मीय विवाहासाठी 'लव जिहाद' या शब्दप्रयोगाचं सार्वत्रिकीकरण करणं) आणि दलित-वंचितांचं (दलित सरपंच महिलेची नग्न धिंड काढणं, दलित मुलाने सवर्ण मुलीशी मैत्री केली तर त्याचे डोळे फोडणं, खून करणं, इत्यादी) होतंय.

खाजगीकरण झाल्यावर आरक्षणाला खरं तर काहीच अर्थ उरत नाही, तरीसुद्धा जातीय अस्मितेच्या राजकारणात आम्हाला आरक्षण मिळालं पाहिजे असं सवर्ण समूहांच्या तर्फे म्हटलं जातं आहे. सामाजिक विषमता, ऐतिहासिक विषमता यांच्यावर आधारित आरक्षण बाजूला ठेवून आर्थिक आरक्षण पाहिजे असं म्हटलं जात आहे. मी ज्या गरीब भारतात वाढले तिथे शिक्षण निःशुल्क होतं. तिथे शाळेत महिन्याला पाच ते दहा रुपये फी देऊन माझं शिक्षण झालं. माझ्या 'एकविसावीच्या' (पहिली ते पीएच. डी.पर्यंत) शिक्षणासाठी माझा फक्त पंधरा हजार रुपये खर्च

झाला. माझं एम. एस्सी. (सूक्ष्मजीवशास्त्र) संशोधनाच्या पद्धतीने होतं, तेव्हा माझी वर्षाची फी १००-१५० रुपये होती. संशोधन करण्यासाठी मला दर महिन्याला अडीचशे रुपये मिळायचे, कारण नेहरूंच्या स्वप्नातल्या भारताला वैज्ञानिक पाहिजे होते. म्हणजे ह्या १५,००० पैकी १०,००० रुपये तर मला परतच मिळालेत. **माझ्या गरीब भारतामध्ये जर शिक्षण आणि आरोग्यसेवा जवळपास निःशुल्क होत्या, तर माझ्या श्रीमंत भारतात का नसाव्यात?** माझ्या १५ हजारात सध्या KG क्लासचे पहिलं सेमिस्टर सुद्धा का होत नाही हा प्रश्न माझ्या भाच्या-पुतण्यांच्या मुलांचा शिक्षणाचा खर्च बघता मला पडतो. आर्थिक आरक्षण ही संकल्पनाच मोडीत काढली पाहिजे, कारण देशामध्ये शिक्षण, आरोग्यसेवा निःशुल्कच असल्या पाहिजेत.

दुसऱ्या बाजूने पॅट्रीशिया हिल कॉलिन्स यांची मांडणी समजून घेऊ या. त्या 'Complex Matrix of Domination' बद्दल बोलतात. योगायोगाने त्यासुद्धा रस्त्याचं उदाहरण घेतात. त्या म्हणतात की आपण ज्या रस्त्यावरून चाललेलो आहोत तो काही कारणास्तव बंद झाला. त्या रस्त्यावरून जाताना आपल्या डोक्यामध्ये एक वेळ निश्चित होता, ज्या वेळेत आपल्याला आपल्या ठिकाणापर्यंत पोहोचायचे होते. परंतु तो रस्ता बंद झाल्याने आपण सगळेजण वेगवेगळ्या रस्त्याने चाललोय. पण आता सगळ्यांच्या पुन्हा महामार्गाला लागण्याच्या वेळा एकसारख्या नाहीयेत. कोणाला एखादाच सिग्नल लागला, कुठे पूल कोसळला, एखाद्या रस्त्यावर भीषण अपघात झाला, एखाद्यावर खड्डे आहेत, तर अशा परिस्थितीत ज्यांना सर्वाधिक अडचणींना तोंड द्यावे लागेल ते बरेच मागे अडकून राहणार आहेत. समस्यांची सरळ बेरीज करून चालत नाही कारण वंचितत्व सरळसोट नसतं, ते गुंतागुंतीचे असतं. म्हणजे **पितृसत्ता अधिक जातीव्यवस्था याची बेरीज दोन होऊ शकत नाही; तसेच पितृसत्ता अधिक जहाल की जातिव्यवस्था अधिक दमनकारी, ह्याचं काय उत्तर कसं शोधणार?** पॅट्रीशिया हिल कॉलिन्स त्याला Complex Matrix of Domination म्हणतात. म्हणजे तुम्हाला एक समस्या सोडवताना बाकीच्या समस्या त्यात बाधा आणतात. गरीबांच्या सामाजिक भांडवलाचा (social capital) विचार करू. जे मुख्य प्रवाहात आहेत, ज्यांचे व्यवसाय आहेत, त्या प्रस्थापित सवर्णांचं सामाजिक भांडवल भरपूर असतं. कोणी मागे राहिलं, तर त्या व्यक्तीला आधार देणारे, आर्थिक सहाय्य करणारे नातेवाईक आणि वशिला लावायला ओळखीच्या व्यक्ती असतात. त्याउलट गरीबाचं सामाजिक भांडवल खूप कमी असते. त्यामुळे एकजण शिकला, कमवू लागला तर त्याच्याकडून उधारी मागणारे नातेवाईक, शेजारी हे अनेक पटीने असतात . जातीव्यवस्थेतून निर्माण केले गेलेले वंचितत्व केवळ शिक्षणाने किंवा पदाने जात



नाही. बाबासाहेब आंबेडकर संविधान समितीचे अध्यक्ष होते, तरीही तिथला शिपाई त्यांच्यासाठी आणलेला चहाचा कप टेबलच्या एका कोपऱ्याला ठेवून जायचा, असं वाचनात आलं आहे. म्हणून पॅट्रीशिया हिल कॉलिन्स म्हणतात की खऱ्या अर्थाने, आमूलाग्र बदल घडवून आणायचा असेल तर आपल्याला बहुआयामी काम करावे लागेल. इथे समाजवादी स्त्रीवाद पुन्हा आपल्या मदतीला येतो. पॅट्रीशिया म्हणतात की वंचितत्व नष्ट करायचं असेल तर तळागाळातल्या माणसाच्या जिवंत अनुभवांतून आणि वंचित समूहांच्या नेतृत्वातूनच हे शक्य होईल.

याच भूमिकेतून 'मासूम'ने २००६ साली 'महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद' आणि 'स्त्री मुक्ती संघटने'बरोबर 'महाराष्ट्र महिला हिंसामुक्ती परिषद' ह्या दोन प्रक्रिया सुरू केल्या. त्यामागचा नेमका उद्देश काय होता? ज्ञानातली जातिव्यवस्था, (जसे की 'शूद्रांनी', म्हणजेच गाव-वस्तीपातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी रोजच्या जिवंत अनुभवांतून ज्ञानाची निर्मिती करायची आणि 'बामणांनी', म्हणजे उच्चशिक्षित, संशोधकांनी, विद्यापीठातील श्रेष्ठींनी त्या आधारावर पोथी लिहायची), मोडून काढायची. त्यामुळे परिषदांच्या स्टेजवर ८०% भाग हा ज्ञानाची निर्मिती करणाऱ्यांचा असला पाहिजे हा आग्रह राहिला आहे. कितीही प्राथमिक असलं तरी ते ज्ञान आहे. **आपण ज्या मानाच्या ठिकाणी बसतो ती खरं तर आपली जागा नव्हतीच, त्यामुळे आपण कोणाला जागा 'देत' आहोत, वंचित समूहातील एखाद्या 'टोकन' व्यक्तीला बोलावून त्या समूहाला 'आवाज देत आहोत' हा उसना मोठेपणा आणि अभिनिवेश असता कामा नये. ज्यांचा आवाज दाबला गेला होता आणि जात, शिक्षण इत्यादींमुळे आपल्याकडे privilege म्हणून मिळाला होता, तो नाकारून ज्याचा असायला हवा होता त्याला परत करत आहोत, आपण आपल्याला मिळालेली खुर्ची परत देत आहोत. आपली जागा श्रोत्यामध्ये आहे, शिकणाऱ्यांमध्ये आहे हे मान्य करणे गरजेचे आहे. तिथे बसून लर्निंग आणि 'अनलर्निंग' करायचं आहे. नवं शिकायचं आहे, त्यासोबत पूर्वी शिकलेलं, शिकवलेलं (उदा. इतरांबद्दलचे पूर्वग्रह, श्रेष्ठत्वाच्या संकल्पना) पुसून टाकायचं आहे,** हा भाग पॅट्रीशिया अधोरेखित करतात.

किंबर्ली आपल्याला वगळणुकीची पार्श्वभूमी शिकवतात तर पॅट्रीशिया त्याच्यामधून मार्ग कसा काढायचा याबद्दल सांगतात.

पॅट्रीशिया जपणुकीच्या नीतीशास्त्रा (Ethics of caring) बद्दल देखील बोलतात. त्या म्हणतात की जपणूक आणि तदनुभूतीच्या नैतिकतेशिवाय स्त्रीवादी काम करता येणार नाही. (Feminist work cannot be without the ethics of caring and empathy.) यामुळे मला या दोघीजणी खूप भावतात. यामागचं आणखी एक कारण म्हणजे आम्ही जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठात आंतरराष्ट्रीय आरोग्य विभागात आमंत्रित व्यक्ती म्हणून एक वर्षभर होतो. हे जगविख्यात विद्यापीठ अमेरिकेतील कृष्णवर्णीयबहुल अशा बाल्टीमोर शहरात आहे.

एकीकडे विद्यापीठाचा झगमगाट आणि दुसरीकडे प्रचंड गरिबी असा विरोधाभास बघायला मिळाला. आमची मुलं कृष्णवर्णीयांच्या शाळेत गेली. मित्र, शिक्षक सगळे कृष्णवर्णीय होते. तिथे आम्हाला learning-unlearning म्हणजे काय हे नव्याने कळलं. एके दिवशी मुलांची मित्रमंडळी घरी आली असताना मी स्वतःला विचारलं की **"जोपर्यंत 'ब्लॅकमेल', 'ब्लॅकमनी' 'इतिहासातील काळा दिवस' असे वंशवादी शब्दप्रयोग वापरले जातात, तोपर्यंत खऱ्या अर्थाने कृष्णवर्णीयांचे आयुष्य, प्रश्न वगळलं जाणं कसं लक्षात येईल? त्यामुळे आपल्याला शब्दकोश नव्याने तयार करणं खूप गरजेचं आहे. भाषेमध्ये असलेला लिंगभेद, जातिभेद, वर्णभेद (उदा. जातीसूचक, लिंगसूचक किंवा धर्मसूचक शिव्या, अशिक्षित किंवा गावात राहणाऱ्यांविषयी असलेले पूर्वग्रह) अधोरेखित करून भेदभाव मिटवणं खूप गरजेचं आहे.** पारलिंगी किंवा समलिंगी आयुष्य सन्मानाने जगण्याचा अधिकार, विकलांग व्यक्तींचे लैंगिक अधिकार आपण आपल्या संविधानाने दिलेल्या 'समानतेच्या' अधिकारात सहजपणे जोडून घेऊ, तेव्हा खऱ्या अर्थाने आपलं learning आणि unlearning होईल असं मला वाटतं. ते करण्यास आपल्याला किंबर्ली आणि पॅट्रीशियाच्या यांच्या लिखाणाची मदत होते. आपल्या देशातील स्त्रीवादी चळवळीची व्यापक समज ही जमेची बाजू आहे. दलित पँथर, कामगार चळवळ, शेतमजुरांच्या संघटना अशा एकोणिसशे साठ आणि सत्तरच्या दशकातील विविध चळवळी खूप वेळा एकत्र काम करत होत्या. नामांतराच्या चळवळीत त्यासाठी झालेल्या ऐतिहासिक 'लॉंग मार्च' मध्ये आम्ही सगळे होतो. 'हे तुमचं काम-ते आमचं काम' असं तेव्हा नव्हतं. त्यावेळेसही जातीच्या प्रश्नाचं आकलन होतं, पण यापुढे फक्त मुद्द्यांचा अंतर्भाव करून चालणार नाही, तर अंतर्गत नेतृत्व कोणाचं असेल हा मुद्दा महत्त्वाचा ठरणार आहे.

**सर्वंकष**: *या मुद्द्यावरूनच आता चळवळीत तट पडलेले आहेत, असं वाटतं का?*

मनीषा: पडू शकतात. जोपर्यंत वंचित महिलांचे नेतृत्व स्त्रीवादाच्या 'मुख्य प्रवाहात' अधोरेखित केलं जात नाही, तोपर्यंत हा धोका राहीलच. उदाहरणार्थ, चळवळीच्या व्यासपीठावर बोलणारी मुस्लिम व्यक्ती मुस्लिम समाजाचं प्रतिनिधित्व करते असं आपण मानतो. त्याच पद्धतीने ख्रिश्चन, आदिवासी व्यक्ती त्यांच्या समूहाचे प्रतिनिधित्व करते असं आपण मानतो. मग **मी जरी दुसऱ्या पिढीची नास्तिक असले तरीसुद्धा माझं नाव हिंदू सवर्ण आहे, तर मग मी हिंदू सवर्णांच्या वतीने बोलते आहे, असं का म्हटलं जात नाही? माझी भूमिका ही विशिष्ट वर्गाची नसून स्त्रीवादी चळवळीची भूमिका मानली जात असेल तर वंचित किंवा अल्पसंख्य समूहातील व्यक्तींची भूमिका त्यांच्या समूहापुरतीच सीमित का मानली जावी?** ही प्रतीकात्मकता बाजूला ठेवली पाहिजे. अर्थातच वंचित समूहांच्या वतीने इतरांनी बोलणे किंवा त्या समूहाचे नेतृत्व करणे चुकीचे आहे हे तितकंच खरं. कारण वंचितांचे जिवंत अनुभव (lived realities) अभिजन वर्गाकडे नसणार आहेत. म्हणून मी 'पुरुष स्पंदन'मधल्या लेखाच्या समारोपामध्ये म्हटलं आहे की सध्याच्या धार्मिक आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या वातावरणात टिकून राहायचे असेल **तर स्त्रीवादी आणि पुरोगामी चळवळींना अंतर्गत समीक्षेची गरज आहे. आपण सर्व धर्मांबद्दल चर्चा करतो, जाणून घेण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा हिंदू धर्माबद्दल बोलायला साधारणपणे आपल्यासारखा धर्मचिकित्सक किंवा नास्तिक माणूस आणतो.** मात्र ख्रिश्चन धर्माबद्दल बोलण्यासाठी पांढऱ्या झग्यातला पाद्री आणि मुसलमानांबद्दल बोलण्यासाठी मौलवी का आणतो? त्या-त्या समूहांत धर्मचिकित्सक आणि नास्तिक असतीलच ना? **बहुसंख्य धर्मातील व्यक्तींनी धर्मनिरपेक्ष भूमिका घेणे, मात्र अल्पसंख्य समूहाचे प्रतिनिधित्व धार्मिक व्यक्तींच्या हाती देणे आपल्याकडून होता कामा नये.** इतर धर्माच्याबद्दल फार माहिती नसल्याकारणाने या गोष्टी अजाणतेपणातून केल्या जातात, परंतु त्याचा परिणाम भीषण होतो. कारण अल्पसंख्य व्यक्तींना (विशेष करून महिलांना) बहुसंख्यांचा मूलतत्त्ववाद आणि स्वतःच्या अल्पसंख्य समूहाचा मूलतत्त्ववाद असे दुहेरी घाव सोसावे लागतात. भारतीय संविधानाने अधोरेखित केलेल्या मूल्यांच्या (लोकशाही, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समानता, समाजवाद आणि धर्मानिरपेक्षता) आधारेच पुरोगामी चळवळी टिकून राहणार आहेत यात शंका नाही. अल्पसंख्य समूहांतील महिलांचा आवाज बुलंद करण्यासाठी प्रत्येक धर्मातील प्रतिगामी शक्तींचा विरोध करणं, सर्व धर्मातील पुरोगामी ताकदी भक्कम करणं, आणि चळवळीच्या अंतर्गत नेतृत्वामध्ये सर्वांसाठी समान स्थान निर्माण करणं गरजेचं आहे.

(मुलाखतीचा उत्तरार्ध पुढील अंकात)

***